दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६४ वे अंक २१९) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२४ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार, दि.०२ सप्टेंबर २०२५ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## मराठा आंदोलनामागे कुणाची भुमिका हे सरकारने स्पष्ट करावे-शशिकांत शिंदे

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामागे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचा हात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. आता यावरून शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी सत्ताधाऱ्यांना खुलं आव्हान दिलं आहे. शशिकांत शिंदे म्हणाले की, डिपार्टमेंट त्यांच्याकडे आहे. शरद पवार यांचा हात आहे तर त्यांनी सिद्ध करून दाखवावे. पवारसाहेब बोलले नाही तर बोलतात पवार साहेबांनी भूमिका स्पष्ट करावी. अन् साहेब नाही म्हटले तर म्हणतात त्यांचा अदृश्य हात आहे. आता यांच्या मागे नक्की कोणाचा हात आहे की मराठे स्वयंस्फूर्तीने आलेत, की जरांगे पाटील स्वयंस्फूर्तीने आलेत ते सरकारने बघावं. लोकांमध्ये गैरसमज करून राजकारण करायचं बंद करावं, असे त्यांनी म्हटले आहे. शशिकांत शिंदे पुढे म्हणाले की, माझी सरकारला विनंती आहे, कोणी काय कोणाची भूमिका न बघता हे आंदोलन गांभीर्याने घ्यावे. सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी. त्या समितीच्या अहवालाची वाट न बघता सरकारच्या समितीने बैठक घेऊन तत्काळ निर्णय घ्यावे, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.

# मराठा आंदोलकांनी व्यापलेले मुंबईतील रस्ते, ठिकाणे मोकळे करा

## येणाऱ्या आंदोलकांना मुंबईच्या वेशिवरुनच माघारी पाठवा; मुंबई उच्च न्यायालयाचे सरकारला निर्देश

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणासाठी मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करणारे मराठा नेते मनोज जरांगे पाटील आणि आंदोलकांनी न्यायालयाच्या आदेशाचे आणि पोलिसांनी आंदोलनासाठी दिलेल्या परवानगीचे सर्रास उल्लंघन केले आहे. तसेच, गेल्या तीन दिवसांपासून विनापरवानगी आंदोलन केले जात असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट झाले आहे. त्यामुळे, मुंबईकरांचे जीवन पूर्वपदावर आणण्यासाठी जरांगे यांच्यासह आंदोलनाच्या आयोजकांना मंगळवारी दुपारी चारपर्यंत परिस्थिती सुधारण्याची मुदत दिली आहे. मुंबईतल्या आझाद मैदानावर पाच हजार आंदोलकच आंदोलन करू शकतील. इतर मराठा आंदोलकांनी रस्ते आणि मुंबई मोकळी करावी, असे स्पष्ट आदेश सोमवारी झालेल्या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयाने दिले. शिवाय आता कोणालाही मुंबईत येऊ देऊ नका. उद्या दुपारी ४ पर्यंत जिथे रस्ते अडवण्यात आले आहेत, त्या सर्व ठिकाणांवरच्या आंदोलकांना हटवा, असे आदेश न्यायालयाने दिले.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी मुंबईच्या आझाद मैदानात उपोषण सुरू केले आहे. तसेच संपूर्ण मुंबईत मोठ्या संख्येने राज्यभरातून मराठा समाज जमा झाला आहे. रविवारी मनोज जरांगे यांनी आपण मरेपर्यंत उपोषण करणार असल्याची घोषणा केली. परंतु, जरांगेंच्या या आंदोलनाविरोधात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर सुनावणीत उच्च न्यायालयाने काही महत्त्वाचे निर्देश दिले.

या आदेशाचे पालन केले गेले नाही तर सरकार आंदोलकांवर कायद्यानुसार कारवाई करू शकते, असेही न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. त्याचवेळी, यापुढे मुंबईत येणाऱ्या मराठा आंदोलकांना मुंबईच्या वेशीबाहेर रोखण्याचे आणि तेथूनच परत पाठवण्याचे आदेश सरकारला दिले. आमरण उपोषण करणाऱ्या जरांगे यांची वैद्यकीय तपासणी करण्याचेही न्यायालयाने यावेळी स्पष्ट केले. वैधानिक मागणीसाठी आंदोलन करण्याचा अधिकार असला तरी त्यासाठी मुंबईकरांना वेठीस धरण्याचा अधिकार नाही, असेही न्यायालयाने सुनावले.

पोलिसांनी जरांगे यांना आंदोलनासाठी केवळ एक दिवसाची परवागी दिली होती. तसेच, पाच हजार आंदोलक आणि १५०० वाहने मुंबईत आणण्याची अट घातली होती. आंदोलन शांततेत केले जाईल, अशी हमीही जरांगे यांनी दिली होती. परंतु, प्रसिद्धीमाध्यमांत प्रसिद्ध झालेल्या वृत्तांची दखल घेता जरांगे यांनी परवानगीनंतरही आंदोलन सुरू ठेवले आहे. एवढेच नव्हे, तर त्यांनी आंदोलन तीव्र करून राज्यभरातील लाखो मराठ्यांनी मुंबईत यावे, असे आवाहन केले आहे. शिवाय, पाच हजारांहून अधिक आंदोलक मुंबईत आले असून त्यांनी मुंबई विशेषकरून मुंबईतील रस्ते, दक्षिण शिवाजी छत्रपती महाराज स्थानक (पान ४ वर)

### न्यायालयाच्या निर्देशाचे पालन करु-मुख्यमंत्री फडणवीस

न्यायालयाच्या निर्देशानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली असून न्यायालयाच्या निर्देशाचं प्रशासन पालन करणार असल्याचं त्यांनी सांगितलं आहे. 'मी प्रवासात असल्यामुळे उच्च न्यायालयाने काय म्हटलं आहे हे पूर्ण ऐकलं नाही. मात्र, मला जे समजलं त्यात उच्च न्यायालयाने हेच सांगितलं आहे की आंदोलनासाठी जी परवानगी होती, ती परवानगी काही अटी शर्तीसह होती. मात्र, या अटी शर्तींचं उल्लंघन झालेलं आहे. विशेषत: रस्त्यावर ज्या गोष्टी सुरू आहेत, त्याबाबत न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे आणि न्यायालयाने त्याबाबत काही निर्देश दिले आहेत. न्यायालयाच्या निर्देशांचं पालन करणं प्रशासनाला क्रमप्राप्त आहे आणि प्रशासन न्यायालयाच्या निर्देशांचं पालन करेन', असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

### मुंबईकरांना त्रास होईल असे वागू नका

#### मनोज जरांगे यांचे मराठा आंदोलकांना आवाहन

न्यायालयाने मंगळवारपर्यंत रस्ते मोकळे करा असे आदेश दिल्यानंतर आता मनोज जरांगे यांनीही आंदोलकांना आवाहन केलं आहे. मुंबईकरांना त्रास होईल असं वागू नका, कुणाचं ऐकून गोंधळ घालू नका असं आवाहन जरांगे यांनी केलं. मुंबईच्या रस्त्यांवर असलेल्या गाड्या आझाद मैदानाच्या बाजूच्या क्रॉस मैदानात लावा, तिथेच झोपा असंही जरांगे म्हणाले. जर कुणी ऐकणार नाही तर त्याने गावाकडे परत जावं, कुणाच्या आदेशावर हुल्लडबाजी करणाऱ्यांना स्थान नाही. मी शेवटचं सांगतोय, आंदोलनाला बदनाम करू नका अन्यथा सोडणार नाही असा इशाराच मनोज जरांगे यांनी दिला.

मनोज जरांगे यांच्या आंदोलनामध्ये काही ठिकाणी हुल्लडबाजी होत आहे, न्यायालयाच्या निर्देशांचे पालन होत नाही असा आरोप एका याचिकेद्वारे न्यायालयात करण्यात आला. त्यावर मंगळवारी दुपारीपर्यंत मुंबईतील सर्व रस्ते रिकामे करा असे निर्देश न्यायालयाने दिले. त्यानंतर मनोज जरांगे यांनीही तशाच प्रकारचं आवाहन केलं.

मनोज जरांगे म्हणाले की, 'मुंबईकरांना त्रास होईल असं वागू नका, कुणाचं ऐकून गोंधळ घालू नका. पण कधीही लोकांना त्रास झाला नाही, पत्रकारांना त्रास झाला नाही. त्यामुळे तुम्ही संयमाने वागा. आमच्यात कुणीतरी घुसून बदनाम केलं जात आहे.' मला पुन्हा पुन्हा बोलायला सांगू नका, सगळ्यांनी मैदानावर गाड्या लावा. आख्खी मुंबई जेवल एवढं जेवण ग्रामीण भागातून येत आहे. आपल्याला जरा त्रास झाला तर लोक आपल्या एवढे मागे आहेत. मुंबईकरांना त्रास होईल किंवा न्यायालयाच्या निर्देशांचे उल्लंघन करणे असं करू नका असं आवाहन जरांगे यांनी केलं.

# ओबीसीच्या आरक्षणात दुसरे वाटेकरी नको

## आमच्यावर अन्याय झाला तर लाखोंच्या संख्येने मुंबईत धडक देणार; छगन भुजबळांचा इशारा



मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- मराठा आणि कुणबी एक आहे हा मूर्खपणा असल्याचे उच्च न्यायालयाने म्हटले आहे. मराठा समाज हा मागास नाही असे निरीक्षण नोंदवले आहे. त्यामुळं मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देता येणार नाही. मराठा कुणबी एक होऊ शकत नाही असं वक्तव्य मंत्री छगन भुजबळ यांनी केलं आहे. ५० टक्के आरक्षण हे सामाजिकदृष्ट्या मागास असणाऱ्यांसाठी आहे. पण मराठा समाज हा सामाजिक मागास ठरत नाही असे भुजबळ म्हणाले. आमच्या ओबीसीच्या आरक्षणात दुसरे वाटेकरी नको असेही भुजबळ म्हणाले. शरद पवार असो की देवेंद्र फडणवीस कोणीही ओबीसीमध्ये एससीमध्ये एसटीमध्ये नवीन जात टाकू शकत नाही असे भुजबळ म्हणाले. आमच्यावर अन्याय झाला तर लाखोंच्या संख्येने मुंबईत येणार असल्याचे भुजबळ म्हणाले.

आज मी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांना भेटलो आहे. गॅजेट्स सगळे दफ्तर आहे. कोटा ओलांडला तर आम्ही दुसऱ्या दिवशी कोर्टात हजर राहणार असल्याचे भुजबळ म्हणाले. केंद्र सरकारने एक कायदा बनविला आहे. जे ओबीसी किंवा दलित, आदिवासीमध्ये बसत नाहीत पण आर्थिक मागास आहे. पण सामाजिक दृष्ट्या ऐं आरक्षण लागू झाले आहे. त्यात १० टक्के आहे, इतर ८ टक्के उमेदवार मराठा समाजाचे आहेत हे सरकारने जाहीर केल्याचे भुजबळ म्हणाले. ब्राम्हण सुद्धा शेतकरीआहेत. मारवाडी देखील शेतकरी आहेत, मग ते कुणबी आहेत का असे भुजबळ म्हणाले. २७ टक्क्यामधील १७ टक्के शिल्लक आहे. या १७ टक्क्यांमध्ये ३७४ जाती आहेत. तुम्ही आमच्यामध्ये आणखी कोणी टाकू नका. (पान ४ वर)

# हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा साधारण मसुदा तयार

## मुख्यमंत्र्यांसोबतच्या बैठकीनंतर विखे पाटलांची माहिती

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून अवघ्या राज्याचे राजकारण तापले असताना राज्य सरकार हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या मुद्यावर सकारात्मक असल्याची माहिती मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकार हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या मुद्यावर सकारात्मक आहे. यासंबंधीचा एक मसुदाही तयार करण्यात आला आहे, असे ते म्हणालेत.

मनोज जरांगे पाटलांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. यासाठी त्यांनी गत शुक्रवारपासून आझाद मैदानावर आंदोलन सुरू केले आहे. आज त्यांच्या आंदोलनाचा चौथा दिवस आहे. त्यांची प्रकृती काहीशी बिघडण्याची चिन्हे असताना सरकारच्या वर्तुळात त्यांच्या आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. आज या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात एक बैठक झाली. या बैठकीला एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्यासह सर्वच प्रमुख नेते व अधिकारी उपस्थित होते. या बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना राधाकृष्ण विखे पाटलानी सरकार हैदराबादचे गॅझेट लागू करण्याच्या मुद्यावर सकारात्मक असल्याचे स्पष्ट केले.

## मोदी-पुतिन-जिनपिंग यांची भेट होताच डोनाल्ड ट्रम्प यांची आगपाखड

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत आज सकाळी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट घेतल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारताविरोधात आगपाखड केली आहे. भारताबरोबर आमचे एकतर्फी व्यापार संबंध होते, असे ट्रम्प म्हणाले आहेत. ट्रुथ या सोशल मीडिया साईटवर त्यांनी एक लांबलचक पोस्ट टाकून भारताशी असलेल्या व्यापार संबंधावर भाष्य केले आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या पोस्टमध्ये म्हटले, 'बऱ्याच कमी लोकांना माहीत आहे की, आम्ही (अमेरिका) भारताबरोबर अतिशय कमी व्यापार करतो. पण ते मात्र आमच्याकडे चांगला व्यापार करतात. (पान ४ वर)

## कांदा खरेदीत नाफेड-एनसीसीएफचा घोटाळा; शेतकऱ्यांचे २०० कोटी रुपये अडकले

### राजू शेट्टींची खत कंपन्यांवर कारवाईची मागणी

पुणे दि.१ (प्रतिनिधी)- केंद्र सरकारच्या किंमत स्थिरीकरण निधी योजनेअंतर्गत नाफेड व एनसीसीएफ या दोन नोडल एजन्सी यांनी प्रामुख्याने महाराष्ट्रातील नाशिक अहिल्यानगर पुणे व छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये तीन लाख टन कांद्याची खरेदी पूर्ण केली. मात्र, दोन महिने होऊनही थकीत २०० कोटी रूपये मिळाले नसल्याने तातडीने सदरचे पैसे व्याजासह शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याची व खताचे लिकींग करणा-या कंपन्यांचे अनुदान थांबविण्याची मागणी केंद्रीय कृषी मंत्रालयाचे सचिव देवेश चतुर्वेदी यांचेकडे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी केली.

यावेळी कृषी सचिव देवेश चतुर्वेदी यांनी तातडीने नाफेडच्या कार्यकारी संचालक यांना चार दिवसात शेतक-यांच्या खात्यावर पैसे जमा करण्याच्या सुचना दिल्या. त्याबरोबरच लिंकींग करणा-या खत कंपन्याना वारंवार सांगूनही लिंकींग करू लागल्याने खत कंपन्या शेतकऱ्यांची मोठी आर्थिक लुबाडणूक करत आहेत. लिंकींग कारवाई बाबत स्थानिक पातळीवर फक्त नौटंकी केली जात आहे. यामुळे केंद्र सरकारने थेट लिंकींग करणा-या खत कंपन्यांचे अनुदान थांबविण्याची मागणी केली.

नाफेड व एन.सी. सी. एफ च्या माध्यमातून झालेल्या खरेदीमध्ये मोठा घोटाळा झाला असल्याचे निदर्शनास आले आहे. याआधीही नाफेड व एन.सी. सी. एफ कडून अनेक मोठे घोटाळे करण्यात आले आहेत मात्र या घोटाळ्यावर पांघरून घालण्यात आले आहे. मात्र सदर घोटाळा अधिकारी व शेतकरी उत्पादक कंपन्या सहकारी संस्था यांनी केला असल्याने शेतकरी याचा बळी ठरला आहे.शेतकऱ्यांना खरेदीदारांचे उंबरे झिजवावे लागत आहेत.

## आंदोलक गाडीतून देशी दारूच्या बाटल्या आणताहेत, कारवाईचे आदेश द्या; गुणरत्न सदावर्तेंचा आरोप

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- माझ्या मुलीला उद्या शाळेत जायचं आहे, पण मराठा आंदोलकांसमोर पोलीस हेल्पलेस झाले आहेत असं ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी न्यायालयात सांगितलं. तसेच बाहेरून येणारे आंदोलक हे गाडीतून देशी दारूच्या बाटल्या आणत आहेत असा आरोप सदावर्ते यांनी केला. जेवणाचे साहित्य घेऊन येत असतील तर त्यांना मुंबईत येऊ द्यावं अशा युक्तिवाद मराठा आंदोलकांच्या वकिलांनी केला. त्यावर प्रतिवाद करताना ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी हा आरोप केला. आज राज्याचा मुख्यमंत्री मराठा नाही म्हणून हे सुरू आहे असा आरोपही सदावर्ते यांनी केला.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाविरोधात दाखल केलेल्या याचिकेवर तातडीची सुनावणी घेण्यात आली. सोमवारी सुट्टी असताना (पान ४ वर)

## अफगाणिस्तानात शक्तिशाली भूकंप; ८०० नागरिकांचा मृत्यू, २५०० जण जखमी



नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- अफगाणिस्तानात पुन्हा एकदा भीषण भूकंप झाला असून रविवारी रात्री उशिरा अफगाणिस्तानच्या पूर्वेकडील भागात सहा रिश्टर तीव्रतेचा भीषण भूकंप झाला. यतिव्र भूकंपात आत्तापर्यंत ८०० लोक मृत्युमुखी पडले आहेत. तर २५०० लोक गंभीर जखमी झाले आहेत. भूकंपात अनेकांची घरे कोसळली असून ढिगाऱ्यां खालून नागरिकांना बाहेर काढण्यासाठी बचाव पथकांकडून शोध घेतला जात आहे.

अमेरिकन जिओलॉजिकल सर्वेने दिलेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री ११:४७ वाजता हा भूकंप झाला. नांगरहार प्रांतातील जलाला बाद पासून २७ किलोमीटर (पान ४ वर)

## महिनाभरातच जीएसटी संकलनात मोठी वाढ

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- देशाच्या तिजोरीत मोठी भर पडली आहे, जीएसटी संकलनात मोठी वाढ झाल्याचे चित्र दिसत आहे. ऑगस्ट २०२५ मध्ये जीएसटी संकलनाचा आकडा हा १.८६ लाख कोटी रुपयांवर गेला आहे. गेल्या वर्षी ऑगस्ट २०२४ मध्ये जीएसटी संकलन १.७५ लाख कोटी रुपये होते. यावर्षी मात्र, यामध्ये ६.५ टक्क्यांची वाढ झाली आहे. जर आपण गेल्या महिन्याची म्हणजेच जुलै २०२५ ची तुलना केली तर जुलैमध्ये जीएसटी संकलन १.९६ लाख कोटी रुपये होते, जे ऑगस्टपेक्षा जास्त आहे. ऑगस्ट महिन्यात जुलै महिन्यापेक्षा जीएसटी संकलनात किंचीत घट झाली आहे.

जुलै महिन्याच्या तुलनेत जीएसटी संकलनात ऑगस्टमध्ये थोडीशी घट झाली आहे. जुलै महिन्यात सण आणि इतर आर्थिक घडामोडींमुळे संकलन जास्त होते, तर ऑगस्टमध्ये ते सामान्य पातळीवर परत आले. (पान ४ वर)

## मुंबईकडे जाण्यासाठी रेल्वे स्थानकांवर गर्दीच-गर्दी; मराठा आंदोलकांवर रेल्वे पोलिसांचे लक्ष

नागपूर दि.१ (प्रतिनिधी)- मुंबईत सुरू असलेल्या मराठा आंदोलनात सहभागी होण्यासाठी निघालेली मंडळी ठिकठिकाणच्या रेल्वे स्थानकांवर पोहचत आहे. परिणामी मुंबई रेल्वे मार्गावरच्या बहुतांश मोठ्या रेल्वे स्थानकांवरील गर्दीत दोन दिवसांपासून लक्षणिय वाढ झाली आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणाही अलर्ट मोडवर आल्या आहेत.

रेल्वेच्या शिर्षस्थ सूत्रांनुसार, मुंबईच्या दिशेने धावणाऱ्या जवळपास सर्वच गाड्यांमध्ये बसण्यासाठी ठिकठिकाणच्या रेल्वे स्थानकांवर रविवारी दुपारपासून गर्दी वाढली आहे. आधीच सणासुदीमुळे आरक्षणासाठी रेल्वेत चढाओढ सुरू असताना आता आणखी अतिरिक्त प्रवाशांची भर पडल्याने अनेक गाड्यांमधील कोच 'हाऊस फुल्ल' झाल्याचे चित्र आहे. अनेक प्रवासी अनारक्षित डब्यांमध्ये (जनरल कोच) स्थान मिळवण्यासाठी वेळेपूर्वीच रेल्वे स्थानकांवर पोहचत असल्याने फलाटांवरही गर्दीचा ताण जाणवू लागला आहे.

रेल्वे सुरक्षा दल (आरपीएफ), लोहमार्ग पोलिस (जीआरपी) आणि स्थानिक पोलीस यंत्रणाही सतर्क झाल्या आहेत. संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी रेल्वे स्थानकाच्या (पान ४ वर)

# भारत-चीन संबंध नव्या वळणावर

अमेरिकेने लादलेल्या प्रचंड टॅरिफच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे शांघाय सहकार्य परिषदेसाठी चीनला जात आहे. गलवान खोऱ्यातील चकमकीनंतर आता भारत आणि चीनचे संबंध सुधारत आहेत. मोदी यांच्या दौऱ्यात भारत आणि चीनमध्ये सीमाप्रश्न तसेच अन्य बाबतीत काही धोरणात्मक निर्णय घेतले जातील. भारताच्या बाबतीत अमेरिकेला जे स्थान होते, ते स्थान चीन घेऊ शकेल का, याची आता चर्चा सुरू झाली आहे.

बहुपक्षीय व्यापार व्यवस्था राखण्यासाठी चीन भारतासोबत खंबीरपणे उभा राहील, असे वक्तव्य भारतातील चीनचे राजदूत झू फेहोंग यांनी अमेरिकेने भारतावर लादलेल्या आयात शुल्कवाढीविरुद्ध बोलताना केले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'टॅरिफ वॉर'नंतर भारत आणि चीन अधिक जवळ यायला लागले आहे. चीन ही जगातील दुसऱ्या क्रमाकांची अर्थव्यवस्था आहे. अमेरिकेचे संरक्षण तसेच अन्य साहित्याची बाजारपेठ चीनने काबीज केली. दुसरीकडे, रशिया हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा अण्वस्त्र सज्ज देश आहे. चीन, रशिया आणि भारत हे तीन देश एकत्र येऊ नयेत, यासाठी आतापर्यंत अमेरिकेने व्यूहनीती रचली. दक्षिण आशियातील चीनचा वाढता हस्तक्षेप थांबवण्यासाठी तर अमेरिकेने भारताला मदतीचा हात पुढे केला होता. अमेरिकेला पाकिस्तानची तेवढी गरज राहिली नव्हती. रशियापासून भारताला दूर करता आले, तर करावे हाही अमेरिकेचा हेतू होता. रशिया मित्र असला, तरी भारताने अमेरिकेशी व्यापार वाढवला होता. संरक्षण साहित्याची खरेदीही वाढवली होती. अशा परिस्थितीत ट्रम्प यांच्या आयात शुल्कवाढीमुळे तसेच अन्य बेताल बडबडीमुळे भारत दुखावला. भारताची रशियाशी जवळीक आणखी वाढली. चीननेही अमेरिकेला शह देण्यासाठी भारताशी संबंध सुधारण्याची इच्छा व्यक्त केली. भारताची बाजू घेत चीनच्या परराष्ट्रमंत्र्यांनी भारतात येऊन काही करार केले. आता नरेंद्र मोदी शांघाय सहकार्य परिषदेसाठी चीनला जात आहे. अशावेळी भारतासाठी चीन अमेरिकेचे स्थान घेऊ शकेल का, अशी चर्चा सुरू झाली असली, तरी पूर्वानुभव पाहता व्यापार सहकार्य करताना चीनवर किती विश्वास ठेवायचा, हा प्रश्न आहे.

गलवान संघर्षानंतर तीन प्रमुख खिंडीमधून भारत आणि चीनमधील व्यापार थांबला होता. आता तो पुन्हा सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांनी नवी दिल्ली येथे भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि मोदी यांची भेट घेतली. विस्तृत चर्चेनंतर एक संयुक्त दस्तावेज जारी करण्यात आला. दस्तावेजात म्हटले आहे की दोन्ही देशांनी सीमा व्यापार पुन्हा सुरू करण्यास सहमती दर्शवली आहे. हा व्यापार तीन नियुक्त मार्गांनी होईल. अमेरिकन टॅरिफविरुद्ध आवाज उठवणाऱ्या देशांमध्ये चीन आघाडीवर आहे. दोन्ही देशांमधील कटुता इतकी वाढली होती, की अमेरिकेने चिनी वस्तूंवर १४५ टक्के कर लादला होता तर चीनने अमेरिकन उत्पादनांवर १२५ टक्के कर लादला होता.

त्यानंतर मे २०२५ मध्ये जीनिव्हा येथे झालेल्या बैठकीत दोन्ही देशांनी व्यापार कराराअंतर्गत टॅरिफ कमी केले. असे असूनही दोन्ही देशांमधील टॅरिफचा प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाही. चीनने पुन्हा एकदा अमेरिकेविरुद्ध आवाज उठवला; परंतु यावेळी त्याने भारताची निवड केली. अमेरिकेची तुलना धमकावणाऱ्या खलनायकाशी करताना चीनचे मुत्सद्दी शू फेहोंग म्हणाले, की ते बऱ्याच काळापासून मुक्त व्यापाराचा फायदा घेत आहेत; परंतु आता ते इतर देशांकडून जास्त किमती मागण्यासाठी सौदेबाजीचे शस्त्र म्हणून टॅरिफचा वापर करत आहे. अमेरिकेने भारतावर पन्नास टक्क्यांपर्यंत किंवा आणखी जास्त टॅरिफ लादण्याचा चीन तीव्र विरोध करतो. त्यांनी दोन्ही देशांचे वर्णन आशियातील आर्थिक विकासाचे डबल इंजिन म्हणून केले आणि सांगितले, की भारत आणि चीनमधील एकतेचा फायदा संपूर्ण जगाला होईल. युक्रेन युद्धानंतर भारताने रशियाकडून कच्च्या तेलाची आयात वाढवली होती. यामुळे अमेरिकेसोबतच्या संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला आणि व्यापार करारावरील वाटाघाटींवर परिणाम झाला. भारताने युक्तिवाद केला, की बायडेन प्रशासनाने जागतिक ऊर्जा बाजारपेठ स्थिर करण्यासाठी भारताला रशियन तेल खरेदी करण्यास सांगितले होते. मात्र आता युक्रेन युद्धात भारत रशियाच्या युद्धयंत्रणेला पाठिंबा देत असल्याचे अमेरिकेचे म्हणणे आहे.

एकीकडे, भारताच्या अमेरिकेसोबतच्या व्यापारी संबंधांमध्ये अस्थिरता दिसून येत आहे, तर दुसरीकडे, भारत आणि चीनमधील संबंध वेगाने मऊ होत आहे. २०२० मध्ये लडाखमधील गलवान येथे झालेल्या संघर्षानंतर दोन्ही शेजाऱ्यांमधील संबंध बिघडले. तेव्हापासून चीन आणि भारत हळूहळू संबंध सामान्य करण्याच्या दिशेने काम करत आहेत. चीन असो किंवा अमेरिका, दोन्ही देशांविरुद्ध जनतेच्या भावना तीव्र आहेत. लोक कोणाच्या विरोधात जास्त आहेत, हे लक्षात घ्यायला हवे. चीनशी दीर्घकाळापासून सीमा वाद आहे; परंतु ट्रम्प आणि मोदी यांच्यात मैत्री असूनही एकतर्फी कर लादणे हे भारतासाठी धक्कादायक आहे. ट्रम्प यांनी भारतावर लादले तितके शुल्क भारताच्या शेजारील देशांवर लादले नाही. म्हणूनच येथे अमेरिकाविरोधी भावना चीनविरोधीपेक्षा कमी नाही. भारत आणि चीनमधील वाढत्या जवळीकतेशी संबंधित अनेक घटकांपैकी अमेरिका हा एक घटक आहे. गेल्या काही महिन्यांपासून दोन्ही देशांमध्ये सतत चर्चा सुरू होती.

चीन आर्थिकदृष्ट्या समृद्ध असून भारताचा एक महत्त्वाचा व्यापारी भागीदार आहे. अमेरिका आणि भारत यांच्यातील मजबूत भागीदारी, विशेषतः क्वाड (भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया)सारख्या गटांद्वारे चीनच्या प्रादेशिक प्रभावाचे संतुलन साधण्याचा प्रयत्न करते. 'क्वाड' देश औपचारिक लष्करी युतीऐवजी अनौपचारिक गट म्हणून वावरतात; परंतु चीन याकडे स्वतःविरुद्धची काही देशांची युती म्हणून पाहतो. भारत आणि अमेरिका यांच्यातील तणाव वाढला तर ही भागीदारी कमकुवत होऊ शकते. त्यामुळे इंडो-पॅसिफिक प्रदेशात चीनचा प्रभाव वाढू शकतो. जपानदेखील ट्रम्प यांच्या १५ टक्के अमेरिकन टॅरिफवर खूश नाही. ट्रम्प ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांना भेटत नाहीत. परिणामी, सध्या क्वाडच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह लागले आहे.

भारत आणि चीन 'ब्रिक्स'सारख्या संघटनांद्वारे 'ग्लोबल साउथ'च्या नेतृत्वात उभे रहात आहेत. दोन्ही देश 'ग्लोबल साउथ'च्या देशांना एकत्र करून पाश्चात्य देशांचे वर्चस्व संतुलित करतात. भारताने आतापर्यंत वेगवेगळ्या जागतिक व्यासपीठांवर धोरणात्मक स्वायत्तता राखण्याचा प्रयत्न केला आहे. एकीकडे, भारत अमेरिका आणि पाश्चात्य देशांसोबत 'क्वाड' संघटनेत सहभागी आहे, तर दुसरीकडे 'ब्रिक्स' आणि शांघाय सहकार्य परिषदेत चीन आणि रशियासोबत सहकार्य करत आहे. ही स्वायत्तता भारताला जागतिक व्यासपीठावर अधिक प्रभावशाली बनवते. कारण भारत पूर्णपणे पश्चिमेसोबत नाही किंवा चीनच्या नेतृत्वाखाली नाही. अमेरिकेबरोबरच्या दुराव्यामुळे भारत आता सावधगिरीने पुढे जाईल. चीन आर्थिक महासत्ता बनल्यामुळे वरचढ आहे; परंतु 'ग्लोबल साउथ'चे नेतृत्व करण्याचा मार्ग चीनसाठी सोपा नाही, कारण 'ग्लोबल साउथ'च्या सर्व देशांचे चीनबद्दल समान मत नाही.

चीनच्या 'गुआंचा' या प्रमुख वेबसाइटवर प्रकाशित झालेल्या एका अहवालात म्हटले आहे की ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात भारताशी असलेल्या जवळच्या संबंधांचे फायदे आता मिळणार नाहीत. या बदलांचा फायदा चीनला होऊ शकतो. शू फेईहोंग यांनी 'एक्स'वरील पोस्टद्वारे अमेरिका आणि चीनशी होत असलेल्या भारताच्या व्यापाराची तुलना केली. या पोस्टमध्ये 'ग्लोबल टाईम्स'चे एक ग्राफिक आहे. त्यानुसार २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारत आणि चीनमधील व्यापार १२७.७१ अब्ज डॉलर्स होता, तर अमेरिका आणि भारतातील व्यापार १३२.२१ अब्ज डॉलर्स होता. तथापि, अमेरिका भारतासाठी सर्वात मोठा निर्यातदार आहे, तर गेल्या काही वर्षांमध्ये चीनसोबत भारताची व्यापार तूट सतत वाढत आहे. अशा परिस्थितीत प्रश्न असा आहे की चीन भारतासाठी अमेरिकेला पर्याय असू शकतो का? याचे उत्तर नाही असे आहे. त्याचे कारण चीन आणि पाकिस्तानमधील मैत्रीत कोणताही फरक पडणार नाही. त्यामुळे चीन कधीही अमेरिकेची जागा घेऊ शकत नाही.

# गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था लोकाभिमुख करण्यावर भर!

**शिक्षण** हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे आणि राष्ट्राच्या प्रगतीचे मूळ आहे. शिक्षणामुळे केवळ ज्ञानसंपादन होत नाही तर आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक जबाबदारी आणि आर्थिक स्वावलंबनाची वाट खुली होते. म्हणूनच शासनाने 'शिक्षण सर्वांसाठी' हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक घटकातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्यासाठी राज्य शासनाने विविध योजना आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. आजच्या युगात शिक्षण व्यवस्थेला विद्यार्थ्यांच्या गरजा, स्वप्ने आणि क्षमतांशी जोडणे ही काळाची गरज आहे. या जाणिवेतून शासनाने शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख करण्यासाठी अनेक ठोस पावले उचलली आहेत. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, संशोधन वृत्तीला आणि कौशल्यविकासाला चालना देणारे उपक्रम राबवले जात आहेत.

अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या

प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. राज्यात २६ फेब्रुवारी २०२४ पासून सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (S>EBC) आरक्षणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी तसेच शासकीय सेवांमधील सरळसेवेसाठी १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. यानंतर मा. न्या. शिंदे समितीच्या शिफारशीनुसार मराठा समाजातील काही विद्यार्थ्यांना कुणबी, कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी जातीचे म्हणजेच इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळाले आहे. मात्र या विद्यार्थ्यांपैकी अनेकांना जातवैधता प्रमाणपत्र तातडीने न मिळाल्याने प्रवेश प्रक्रियेत अडचणी येत होत्या.

या पार्श्वभूमीवर राज्यशासनाने अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सुरुवातीला सहा महिने, त्यानंतर तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती. तरी देखील काही विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवण्यास अडचणी येत आल्याचे निदर्शनास आले आणि अनेक विद्यार्थांनी तक्रारी केल्या होत्या याची राज्य शासनाने दखल घेऊन पुन्हा तीन महिन्यांची अतिरिक्त मुदतवाढ दिली आहे.

याशिवाय, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे प्रवेश जातवैधता प्रमाणपत्रांच्या अभावी त्यांचे प्रवेश रद्द होणार नाहीत आणि शैक्षणिक नुकसान टळणार आहे.

**तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५)**

सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) आरक्षणाच्या अंमलबजावणीनंतर राज्यातील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये मराठा विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रवेश घेतले आहेत.

तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५)

पदवी : १७ हजार ७७८, पदव्युत्तर : १ हजार ९२७, डिप्लोमा : ७ हजार ३५४ म्हणजेच एकूण २७ हजार ०५९ विद्यार्थी यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये डएइउ आरक्षणाअंतर्गत प्रवेश घेतलेला आहे.

**डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना**

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. ही योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत 'डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना' या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे. यामध्ये मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा आणि कुणबी-जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाने सुरु केलेली डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना ही विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे. सन २०२२-२३ पासून या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ मिळू लागले असून, उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढत असून शिक्षणाचा दर्जा वाढविण्यास मदत होत आहे.

या योजनेअंतर्गत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. विद्यार्थ्यांना केवळ शुल्क सहाय्यच नव्हे, तर वसतिगृह, पुस्तके, अभ्यास साहित्य, प्रवास भत्ता आदी विविध सुविधा पुरवल्या जातात.यामुळे मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील गरीब व हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन. आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक जगात उभे करण्यासाठी शैक्षणिक मदत होऊन उच्च व तांत्रिक शिक्षण घेताना होणारा आर्थिक खर्चही कमी होतो त्यामुळे उच्च शिक्षणात विद्यार्थांचे प्रमाण वाढते.

**छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती**

मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी लक्षित गटातील पीएच.डी. करणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीच्या माध्यमातून विशेष प्रोत्साहन देण्याकरिता सन २०१९ या वर्षापासून छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF) सुरु करण्यात आली आहे. सदर छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती अंतर्गत लक्षित गटातील ३०७८ विद्यार्थ्यांना सारथी संस्थेद्वारे सन २०२३ पर्यंत अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.आज रोजी पर्यंत ३९३ विद्यार्थ्यांची झहऊ पुर्ण झाली असून ११० विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी नोकरी लागली आहे. या विद्यार्थ्यांपैकी २३ विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन विषयात पेटंट मिळाला आहे.

**विद्यार्थ्यांना देण्यात येणारी विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे अधिछात्रवृत्ती :**

JRF प्रमाणे (प्रथम ०२ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती णऋउ निकषा नुसार ५ लाख ५३ हजार ३००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ४६ हजार १०८ आहे.

तसेच SRF प्रमाणे (२ वर्षानंतर पुढील ०३ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती ६ लाख २९ हजार ८००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ५२ हजार ४८३ देण्यात येते. अधिछात्रवृत्ती अंतर्गत अंतिमरित्या निवड झालेल्या उमेदवारांना आर्थिक सहाय्य हे सारथीकडून ज्या रोजी अवार्ड लेटर (Award Letter) दिले जाईल, त्या तारखेपासून पुढे पीएच.डी. करिता पाच वर्ष किंवा उमेदवार संशोधनासाठी विद्यापीठ महाविद्यालय/संस्था येथे रुजू झालेला असेल.

(विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेच्या अहवालातील नमूद रुजू तारीख), या वेळी जी नंतरची तारीख असेल त्या तारखेपासून उमेदवाराच्या फक्त उर्वरित कालावधीसाठी पीएच.डी. च्या फक्त उर्वरित कालावधीसाठी एकुण ५ वर्षांच्या कालावधीच्या आधारे किंवा उमेदवारांनी ज्या तारखेस संशोधन अहवाल (Dissertation) सादर केला असेल, यापैकी जी अगोदरची तारीख असेल त्या तारखेपर्यंत अनुज्ञेय राहील. निवड झालेल्या लाभार्थ्यांना रक्कमे संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे (UGC) अंतर्गत होणाऱ्या बदलानुसार अधिछात्रवृत्ती अनुज्ञेय राहील.

अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत सन २०१९ मध्ये पात्र विद्यार्थी ५०३, पीएचडी घेतलेले विद्यार्थी २४६, नोकरी लागलेले विद्यार्थी ७४ आहेत. सन २०२० मध्ये पात्र विद्यार्थी २०४, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ८०, नोकरी लागलेले विद्यार्थी १८ आहेत. सन २०२१ मध्ये पात्र विद्यार्थी ५५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ६४, नोकरी लागलेले विद्यार्थी १० आहेत. सन २०२२ मध्ये पात्र विद्यार्थी ८५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ४, नोकरी लागलेली विद्यार्थी १ आहेत. सन २०२३ मध्ये पात्र विद्यार्थी ९६९ आहेत.

**परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती**

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या जातीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता असून आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जातीतील मुलामुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी/पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी QS World Ranking मध्ये २०० च्या आत रॅन्कीग असलेल्या शैक्षणिक संस्था/विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश घेतील अशा मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील एकत्रितपणे ७५ विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत 'सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना' या नावाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राबविण्यात येत आहे. सारथी संस्थेमार्फत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या लक्षित गटातील विद्यार्थ्यांकरिता डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती सन २०२२-२३ पासून २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशित पात्र विद्याध्यर्थ्यांना ही शिष्यवृत्ती लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत 'डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे.

देशाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत भारतातील शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तनाची सुरुवात झाली आहे. देशातील एकूण नोंदणी गुणोत्तर ५०% पर्यंत नेण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी, भारताने जागतिक दर्जाचे शिक्षण आणि संशोधन भारतातच उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत. महाराष्ट्रातही विविध अभिनव आणि परिवर्तनशील उपक्रम शिक्षण क्षेत्रात राबविले आहेत. यामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांपर्यंत संधींची समान उपलब्धता आणि संशोधनाला चालना यावर अधिक भर देऊन गुणवत्तापूर्ण शैक्षणिक बदल करून राज्यातील शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख केली जात आहे.

**-काशीबाई थोरात-धायगुडे**
विभागीय संपर्क अधिकारी
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई

# पुन्हा हिंदी चिनी भाई भाई?

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी 'शांघाय सहकार्य परिषदेच्या 'हेडस ऑफ स्टेट्स' च्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी चीन दौऱ्यावर गेले. ही मोदींची तब्बल सात वर्षानंतर चीनला दिलेली पहिलीच भेट आहे. चीनमध्ये मोदींचे पायघड्या घालून स्वागत झाल्याच्या बातम्या प्रसार माध्यमातून आल्या आहेत. (चीनला जाण्यापूर्वी मोदींनी जपानला भेट दिली).

मोदींच्या चीन भेटीमुळे बऱ्याच शंकासुरांच्या भुवया उंचावल्या आहेत. काही 'हितचिंतक' मोदींच्या चीन भेटीबद्दल नाके मुरडत आहेत. मोदी २०२०ची गलवानची चकमक विसरले का? 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान चीनने पाकिस्तानला उघड पाठिंबा तर दिलाच पण त्याशिवाय पाकिस्तानला सर्व प्रकारची लष्करी मदत केली. भारताने तर असा जाहीर आरोप केला आहे की त्या संघर्षादरम्यान चीन पाकिस्तानला 'रिअल टाइम इंटेलिजन्स' पुरवून भारताच्या लष्करी हालचालींची माहिती देत होता. इतकं असूनही मोदींना चीनला जाण्यावाचून एवढे काय नडले होते असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला असेल तर नवल नाही.नेहरुंच्या 'भोळसट' चीन नितीबद्दल सतत 'बोटे मोडणारे' मोदी आता चीनच्या गळ्यात गळा घालायला एवढे आतुर का? असेही मोदींचे टीकाकार विचारत आहेत. वरील सर्व आक्षेप आपापल्या परीने तर्कशुद्ध वाटतात. मग तरीही मोदी चीनला का गेले? या प्रश्नाचे उत्तर सध्याच्या विलक्षण 'चंचल' अशा जागतिक भूराजकीय परिस्थितीत दडले आहे.

एकविसाव्या शतकाचे एकमेव 'स्थिर' वास्तव आहे ते म्हणजे 'अस्थिरता'. आपण पहात आहोत की जागतिक रंगमंचावर रोज अक्षरशः 'तासा तासाला' नवनवीन नाट्यप्रयोग रंगत आहेत. कालचा नायक आज खलनायकाची भूमिका वठवत असतो तर कालचा खलनायक आज नायकाच्या भूमिकेत जगासमोर येत आहे. या परिपेक्ष्यातून पाहिले तर तुमच्या लक्षात येईल की भारताच्या दृष्टीने कालपर्यंत 'नायकच्या' भूमिकेत दिसणारे 'ट्रम्प' नामक बहुरूपी आज खलनायक ठरले आहेत तर 'क्षी जीन पिंग' नावाचा दगाबाज, पाताळयंत्री शेजारी आता 'शेजारधर्म' पाळण्यासाठी उत्सुक दिसत आहे. याचे कारण म्हणजे 'जगाचा फिरता रंगमंच' पृथ्वी गोल आहे याची जाणीव प्रत्येक राष्ट्राला करून देत आहे.

त्यामुळे प्रत्येक देशाने खूणगाठ बांधली आहे की कोणताही देश आपला कायमस्वरूपी मित्र नाही तसेच कोठलेही राष्ट्र आपले कायमस्वरूपी शत्रू नाही. प्रत्येक देश स्वदेशाचे हित सर्वोतोपरी मानत असल्यानेच 'स्वार्थ' साधणे हेच प्रत्येकाचे अंतिम उद्दिष्ट आहे.

अंतर्गत व बहिर्गत राजकारणातील हे सत्य कालातीत आहे आणि म्हणूनच मोदीजी नेहमी आठवण करून देतात की आपल्या देशाला आपली 'विरासत' विसरून चालणार नाही.जो देश आपला 'इतिहास' विसरला त्या देशाचे भविष्य अंधःकार मय असते हे ते पुन्हा पुन्हा सांगतात. भारताच्या इतिहासाने भविष्यातील मार्ग दाखवला आहे, म्हणूनच आपल्या इतिहासाची आठवण करून देणे अगत्याचे ठरते. आपण शिवाजी महाराजांचे उदाहरण बघू या.शिवाजी महाराजांचे उद्दिष्ट होते ' हिंदवी स्वराज्याची स्थापना' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि नंतर स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी त्यांनी अनेक डावपेच खेळले. त्यातील महत्वाचं सूत्र म्हणजे एका वेळी एकाच शत्रूशी लढणे. त्यासाठी त्यांनी कधी मोगलांशी हातमिळवणी केली तर कधी विजापूरच्या आदिलशाहीशी जुळवून घेतले, पण एक काळजी घेतली ती म्हणजे हे दोघे शत्रू एकत्र येता कामा नयेत. अफझलखान चालून आला तेव्हा महाराजांनी मोंगलाना शांत ठेवले होते. औरंगजेबशी लढताना आदिलशाहीबरोबर मित्रत्वाचे तह केले होते. राज्याभिषेकानंतर कर्नाटकात स्वारी करताना त्यांनी वाटेत गोवलकोंड्याच्या कुतुबशाहशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले कारण काय तर आपल्या मागे कुतुबशाहने स्वराज्याला काही त्रास देऊ नये म्हणून. नंतर कर्नाटकतील स्वारीत जिंकलेल्या प्रदेशातील व महसूलातील अर्धा वाटा ठरल्याप्रमाणे कुतुबशाहला देण्यात मात्र शिवाजी राजांनी टाळाटाळ केली. परिणामी दोघांच्यात वितुष्ट निर्माण झाले पण तोपर्यंत महाराजांनी आपला स्वार्थ साधून घेतला होता. महाराज पन्हाळ्यावर अडकले होते तेव्हा इंग्रजानी सिद्दी जोहारला मदत केली म्हणून महाराजांनी संधी मिळेल तेव्हा इंग्रजाना धडा शिकवला. पण सुरतेवरील स्वारीत त्यांनी ब्रिटिशांच्या वखारी लुटल्या नाहीत कारण इंग्रज लोकं व्यापार करत असल्याने आपल्या रयतेच्या हातात पैसा खेळू लागला आहे याची त्यांना जाणीव होती. या एका कारणामुळे शिवाजी राजे कायम इंग्रजाशी उदारपणे वागले. पुढे पेशव्यानी सुद्धा शिवाजी महाराजांच्याच रणनीतीचा अवलंब केला. पण पानिपतच्या लढाईत मराठे एकटे पडले आणि मुसलमान राजे मात्र अहमदशाह अब्दालीच्या नेतृत्वात 'एक' झाले. (ही नजीबुल्लाची किमया) परिणाम काय झाला तो सर्वश्रुत आहे. (तरी सुद्धा लढाईनंतर मराठ्यांनी अब्दालीशी राजनैतिक संबंध प्रस्थापित केले होते.) तसेच अखेरच्या क्षणी युद्ध टाळण्यासाठी मराठ्यांनी 'तहाचा' प्रस्ताव अब्दालीकडे पाठवला होता व काही प्रदेश (उत्तरेकडचा) सोडण्याची तयारी दाखवली होती.जर त्या वेळी शीख, जाट, राजपूत, मराठे एकत्र लढले असते तर इतिहास निराळाच झाला असता. पुढे महादजी शिंदे व नाना फडणवीस यांनी शिवाजी महाराजांच्या कूट नितीचा अवलंब करून 'पानिपत' मुळे गेलेली पत परत मिळवली आणि दिल्ली पुन्हा आपल्या आधिपत्याखाली आणली.

राणा प्रताप शिवाजी महाराजांसारखाच 'युगपुरुष' होता पण त्याने अकबराविरुद्ध कायम 'एकला चलो रे' हे तत्व अवलंबले त्यामुळे तो आपल्या सम्राज्याला कायमचा मुकला आणि त्याच्या नशिबी वनवास आला. वरील उदाहरणे लक्षात ठेवली तर आताचे भारताचे परराष्ट्र धोरण समजून घेण्यास मदत होईल.'सामायिक परस्पर हितसंबंध' साधायचे असतील तर परराष्ट्र धोरण लवचिक ठेवावे लागते.

मोदी आता ट्रम्पचा नक्षा उतरवण्यासाठी चीनने पुढे केलेला मैत्रीचा हात स्वीकारत आहेत पण त्याच वेळी ते चीनला नियंत्रणात ठेवण्यासाठी स्थापन झालेल्या र्टीरव गटात अमेरिकेच्या मांडीला मांडी लावून बसणार आहेत, हे लक्षणीय आहे. (र्टीरव ची बैठक या वर्षी भारतात होणार आहे आणि ट्रम्प त्यासाठी भारतात येऊ शकतात.) तसेच मोदींच्या चीन भेटीपूर्वी भारताने अग्नी ५ या क्षेपणास्त्राचे यशस्वी परीक्षण केले आहे. (या मिसाईल ची रेंज ५००० ते ७००० किलोमीटर आहे). हे मिसाईल पाकिस्तानसाठी नसून चीनसाठी आहे हे न ओळखण्याइतके 'क्षी' दूधखुळे नाहीत. तरी सुद्धा ते भारताला मैत्रीची साद घालतात कारण 'परस्परा सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' ही सद्यस्थितीत काळाची गरज आहे आणि 'आर आय सी' (रशिया, इंडिया, चीन) मिळून अमेरिकेला शह देऊ शकतात याची त्यांना कल्पना आहे. मोदी चीनला येण्यापूर्वी चीनचे शत्रू राष्ट्र असलेल्या जपानला गेले याची योग्य ती नोंदही चीनने घेतली असेल. मोदी हे चीन बरोबर समर्थ राष्ट्राचे हस्तानदोलन करत आहेत न की दुबळ्या राष्ट्राचे अलिंगन देत आहेत. हे समजून घेतले तर नेहरुंच्या' हिंदी चिनी भाई भाई'ची पुनरावृत्ती मोदी करत नाही आहेत हे लक्षात येईल.

**- रघुनंदन भागवत**

# राजस्थानचे राज्यपाल बागडे यांची संभाजीनगरच्या सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सशी खास भेट



छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) - राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी रविवारी (दि.२४) छत्रपती संभाजीनगरातील टॉप सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सची राजभवनात विशेष भेट घेतली. महाराष्ट्रभर स्वतःची स्वतंत्र छाप निर्माण करणाऱ्या या तरुण क्रिएटर्सशी संवाद साधत त्यांच्या कार्याचे राज्यपालांनी कौतुक केले.

अगदी शून्यातून सुरुवात करून सोशल मीडियाच्या माध्यमातून मोठी ओळख निर्माण करणाऱ्या या इन्फ्लुएन्सर्सनी राजभवनात पाऊल ठेवताच एक वेगळीच उत्सुकता निर्माण झाली. तुम्ही सर्वांनी जिद्दीने आणि मेहनतीने हे यश मिळवलं आहे. ग्रामीण भागातून, छोट्या खेड्यातून उभं राहून महाराष्ट्रभरात प्रसिद्धी मिळवणं ही मोठी गोष्ट आहे. तुमचं काम समाजासाठी प्रेरणादायी आहे,' अशा शब्दांत राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

या भेटीसाठी विशेष मेहनत घेऊन राज्यपालांशी हा संवाद घडवून आणण्यात विजय औताडे यांचे मोलाचे योगदान राहिले. त्यांच्या पुढाकारामुळेच संभाजीनगरातील तरुण क्रिएटर्सना ही दुर्मीळ संधी मिळाली.

या भेटीत प्रशांत वाघ, निर्घोष त्रिभुवन, करिश्मा जैस्वाल, करण पाचुंदे, दीपक पाजगे, वंश देशमुख, आशिष सोनवणे, श्वेता तोगवार, दीपक जोगदंडे, वैदेही मुंडे, कृष्णा हानवते, श्रीसोमनाथ पाटील, यज्ञेश खपले आणि अभिजीत दांगोडे या सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सची उपस्थिती होती. सर्वांना राजभवन पाहण्याची विशेष संधी देखील मिळाली. राज्यपालांनी या तरुण क्रिएटर्सच्या विविध कामाची दखल घेत सांगितले, 'क्रिएटिव्हिटीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवणं हाच खरी ताकद आहे.'

**खाटू श्याम महाराजांच्या मूर्तीचे पूजन व डेकोरेशनचे उद्घाटन**

याच वेळी छत्रपती संभाजीनगरात विजय औताडे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील मयूर पार्क भागामध्ये गणपती उत्सवाच्या निमित्ताने खाटू श्याम महाराजांच्या मूर्तीचे विशेष डेकोरेशन करण्यात आले आहे. राजस्थानहून आणलेल्या या मूर्तीचे पूजन देखील राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते पार पडले. २६ ऑगस्ट २०२५ रोजी या मूर्तीचे भव्य आगमन झाले. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर तयारी करण्यात आली होती.

## जीवनाचा विकास आसन किंवा अधिकाराने होत नाही, तो आचरणानेच होतो- उपाध्यक्ष श्री विरंजन सागर जी महाराज



छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) – देशमुख नगर श्री १००८ भगवान मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिर येथे दशलक्षण पर्वानिमित्त आयोजित धर्मसभेत उपाध्यक्ष श्री विरंजन सागर जी महाराज यांनी प्रवचन करताना सांगितले की, 'उत्तम मार्दव धर्म म्हणजे अहंकाराचा त्याग करून नम्रतेला स्वीकारणे होय.

मुनिश्री म्हणाले की, अहंकार म्हणजे मृत्यु आणि समर्पण म्हणजे मुक्ती. अहंकार माणसाला शून्यतेकडे नेतो, तर समर्पण पूर्णतेकडे नेतो. विनयच मोक्षाचे खरे द्वार आहे. व्यक्तीच्या अंतर्गत असलेला अहंकार त्याला पतनाकडे नेतो, म्हणून नम्रता स्वीकारणे आवश्यक आहे.

ते पुढे म्हणाले की, अहंकार खोटा आहे. मेंदूच्या कोशिका लहान असतात, स्मृती खऱ्या असतात, विचार प्रक्रिया खरी असते, पण आत्मा आणि शरीराचा संयोग झाला की अहंकार निर्माण होतो. अहंकार जिंकण्यासाठी दोन सूत्रे मुनिश्रींनी दिली –

आपल्या उपलब्ध्यांवर नाच करू नका, अहंकार बाळगू नका, मंत्राचा उपयोग करा. आपला भूतकाळ आणि आपली औकात नेहमी लक्षात ठेवा. जीवनाचा विकास आसन किंवा अधिकाराने होत नाही, तो आचरणानेच होतो. सन्मान तात्पुरते असतात, समाधी शाश्वत असते. अहंकाराची पुतळी जळून जाते, पण समाधीधारकाची मूर्ती उभी राहते. 'आत्म्याचा शुद्ध धर्म हाच खरा धर्म आहे. प्रसिद्धीची भावना धर्म नाही,' असेही मुनिश्रींनी नमूद केले. धर्मसभेच्या निमित्ताने हजारो भक्तांनी भगवानांची पूजन-अभिषेक केला. दुपारनंतर तत्वार्थ सूत्र महामंडल विधानाचे आयोजन करण्यात आले.

# भटक्या विमुक्तांना विविध दाखले देण्यासाठी स्वतंत्र समिती -अतुल सावे

## प्रगती साधण्यासाठी शासन भटक्या विमुक्तांच्या पाठीशी - पालकमंत्री



छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) – भटक्या विमुक्त समाजावरचा गुन्हेगारी जमातीचा कलंक आजच्याच दिवशी १९५२ साली दूर करण्यात आला. त्याची स्मृती जागवण्यासाठी आजचा दिवस साजरा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. तसेच, भटक्या विमुक्त जाती-जमातींना विविध दाखले, प्रमाणपत्र मिळिवण्यासाठी ज्या अडचणी येतात त्या लक्षात घेता त्यांना सहाय्य करण्यासाठी स्वतंत्र समिती गठित करण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे, असे इतर मागासवर्ग बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक उर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी आज घोषित केले.

समाजातील प्रत्येक मागासलेल्या घटकांनी शिक्षणाची कास धरून आपल्या समाजाची प्रगती केली आहे. भटक्या विमुक्त घटकांनीही मनाशी निर्धार करून आपली प्रगती करावी. त्यासाठी न्यूनगंड बाजुला ठेवावा. शासन आपल्या पाठिशी आहे, अशा शब्दात राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी उपस्थितांना आश्वस्त केले.

एमजीएम विद्यापीठाच्या रुख्मिणी सभागृहात आज भटके विमुक्त दिवसानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

इतर मागासवर्ग बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक उर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे, सामाजिक न्यायमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, राज्यसभा सदस्य खा. डॉ. भागवत कराड, इमाव संचालनालयाच्या संचालक सोनाली मुळे, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, भटके विमुक्त विकास परिषदेचे अध्यक्ष राहुल चव्हाण, सहसंचालक प्रशांत शिर्के, भटके विमुक्त आयोगाचे सदस्य प्रवीण घुगे, उपसंचालक जलील शेख, तांडा वस्ती अध्यक्ष राजेंद्र राठोड, सहायक संचालक एम. आय. शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

मंत्री श्री. सावे म्हणाले की, भटके विमुक्त दिवस साजरा करणे हा एक प्रकारचा कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. या समाजाने स्वातंत्र्यपूर्व काळापासून देशासाठी मोठे योगदान दिले आहे. छत्रपती शिवरायांच्या काळातही या समाजाने स्वराज्यासाठी योगदान दिले आहे. गुन्हेगारीचा शिक्का पुसल्यानंतरही या लोकांच्या जीवनमानात फारसा बदल होऊ शकला नाही. त्यांच्या जीवनमानात बदल होऊन प्रगती करण्यासाठी शिक्षण, रोजगाराला चालना देणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने शासनामार्फत राज्यात ६३ वसतिगृहे बांधण्यात आली. शालेय ते महाविद्यालयीन शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती तसेच, रोजगारासाठी अर्थसहाय्याच्या विविध योजना सुरु करण्यात आल्या. आरोग्य, निवास यासारख्या प्रगतीचे मापदंड मानल्या जाणाऱ्या निकषांच्या पूर्ततेसाठीही शासनाच्या विविध योजना आहेत.आता ही आपली जबाबदारी आहे, की आपण या योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवावयास हव्या. योजनांचा लाभ घेण्यासाठी विविध दाखले, प्रमाणपत्र आवश्यक असतात. या कागदपत्रांची पूर्तता करणे सतत भटक्या असणाऱ्या समाजाला अशक्य होते. त्यासाठी त्यांना मार्गदर्शन व सहाय्य करण्यासाठी स्वतंत्र समिती तयार करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. आता अशी कागदपत्रे मिळण्यास अडचण निर्माण होणार नाही, असे श्री. सावे म्हणाले.

पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, आपल्या देशात अनेक जाती, जमाती या मागासलेल्या होत्या. या जातींनी शिक्षणाची कास धरून आपली व आपल्या समाजाची प्रगती साध्य केली आहे. भटक्या जमातींनीही शिक्षणाकडे लक्ष द्यावे. चांगल्या उच्च पदावर जावे, आपला उत्कर्ष करताना आपल्या समाजबांधवांनाही मदतीचा हात द्यावा. मनाशी निर्धार करून आपली प्रगती साध्य करावी. त्यासाठी शासन आपल्या पाठिशी आहे.

या कार्यक्रमात राहुल चव्हाण यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच, खा. डॉ. भागवत कराड, प्रवीण घुगे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक श्रीमती सोनाली मुळे यांनी केले. या कार्यक्रमात भटक्या विमुक्त समाजाच्या विकासासाठी योगदान देणाऱ्या विविध व्यक्ती व संघटना, संस्थांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. विविध लोककलांचे सादरीकरण करण्यात आले. त्यास उपस्थितांनी दाद दिली.

# शिल्पा शेट्टीने लावला जान्हवीच्या झिंगाटवर ग्लॅमरचा तडका!

## जान्हवीच्या गाण्यावर थिरकली शिल्पा शेट्टी;'सुपर डान्सर ५' मधील खास एपिसोड

**डान्स** रिॲलिटी शो 'सुपर डान्सर चॅप्टर ५' आपल्या दर्जेदार आणि धमाकेदार परफॉर्मन्सने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. या शोमधील स्पर्धक अध्याश्री, बरकत, सोमांश, सुकृती, आणि अप्सरा यांच्या अप्रतिम नृत्यप्रस्तुतींनी शोला नवे यश आणि उंची मिळवून दिली आहे. प्रेक्षक या सर्व स्पर्धकांशी भावनिकरित्या जोडले गेले आहेत.



आता आगामी भागात या मंचावर ग्लॅमरचा जबरदस्त तडका बसणार आहे, कारण बॉलीवूड अभिनेत्री जान्हवी कपूर शोच्या जज शिल्पा शेट्टीसोबत खास डान्स परफॉर्मन्स करताना दिसणार आहे.

एक हटके ट्विस्ट म्हणून जान्हवीने शिल्पा शेट्टीच्या आयकॉनिक गाण्यावर मैं आई हूँ यूपी-बिहार लूटने जबरदस्त डान्स करत रंगत वाढवली, तर शिल्पा शेट्टीने जान्हवीच्या सुपरहिट गाण्यावर 'झिंगाट' डान्स करत स्टेजवर धम्माल केली.

स्पर्धकांनी आपल्या सुपरगुरूंसोबत परफॉर्म केल्याच्या थीमवरून प्रेरणा घेत शोचे होस्ट परितोष त्रिपाठी यांनी 'डान्स स्वॅप' हे खास सेगमेंट तयार केले, ज्याला जान्हवी आणि शिल्पाने लगेचच होकार दिला. परफॉर्मन्सनंतर शिल्पाने जान्हवीला विचारले, 'झिंगाट'वर तू कशी परफॉर्म केलीस? अनुभव कसा होता?

जान्हवी कपूरने हसत उत्तर दिले, या गाण्यावर परफॉर्म करणं म्हणजे एक असा अनुभव आहे जो कधीच संपत नाही. मी झिंगाटवर जवळपास प्रत्येक लग्नसमारंभ, फंक्शन आणि अवॉर्ड शोमध्ये परफॉर्म करते. माझं वजन वाढत नाही कारण महिन्याला दोन-तीन वेळा मी झिंगाटवर डान्स करत असते. या धमाकेदार परफॉर्मन्सनं सेटवर उपस्थित प्रत्येकाला थिरकायला भाग पाडलं. स्पर्धकही स्टेजवर सहभागी झाले आणि वातावरणात एक वेगळीच ऊर्जा पसरली. जान्हवी आणि शिल्पामधील जबरदस्त ट्यूनिंग आणि केमिस्ट्रीनं हा परफॉर्मन्स वीकेंडच्या सर्वात मोठ्या हायलाइट्सपैकी एक बनवला.

# संत साहित्यातून मिळणारी जीवनदृष्टी आनंददायी असते- डॉ. विजयकुमार फड



जालना, दि. १ (प्रतिनिधी) – संत साहित्य हे मानवाला त्याच्या कर्तव्य व जबाबदारीची जाणीव करुन देणारे असून त्यातून मिळणारी दृष्टी ही आनंददायी असल्याने संत साहित्य वाचायला व अनुभवायला हवे, असे प्रतिपादन ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी केले.

मंठा तालुक्यातील पेव / नळडोह येथे धार्मिक सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात कीर्तनरुपी सेवा पार पाडतांना फड यांनी संत साहित्य हे केवळ वाचण्याचा, ऐकण्याचा किंवा सांगण्याचा विषय नसून ते खऱ्या अर्थाने प्रत्यक्ष अनुभवण्याचा विषय आहेत असे म्हटले. ज्याला संत साहित्याचा अनुभव घेता येतो, त्याला उत्तम तसेच आनंददायी दृष्टी आपोआप मिळते. कीर्तनासाठी घेतलेला अभंग हा ज्ञानेश्वरीशी संबंधीत असल्याने त्यांनी ज्ञानेश्वरीवर भर दिला होता. ज्ञानदेवांनी केलेल्या कार्याची व त्यांच्या श्री ज्ञानेश्वरी, चांगदेव पासष्टी, स्फुट अभंग आणि हरिपाठाची तसेच संत तुकाराम, नामदेव महाराज आदी संतांच्या साहित्याची अनुभूती घेता येईल, त्याच्या जीवनात चिंता, तणाव, वाद, अहंकार, काम, क्रोध, नकारात्मक दृष्टी या मानवी शत्रूंना स्थान असणार नाही. अशा अनुभूती घेणाऱ्या व्यक्तीच्या जीवनात सुख, समाधान, शांती, समृध्दी, सकारात्मक दृष्टी, आनंद आदी आपोआप येत असतात. संतांच्या ग्रंथांची व जीवनकार्याची अनुभूती घेण्याची मूळात ओढ असेल तर ही अनुभूती अवघड नाही. अनेकांचे बाह्यवर्तन, बाह्यसौंदर्य चांगले असते पण प्रत्यक्ष वर्तन, विचार, मानसिक सौंदर्य नकारात्मक असतात. अशांच्या अशा वर्तनाचा विपरित परिणाम अनेकांना भोगावा लागतो.

आपल्याकडून असे विपरित परिणाम कोणाला भोगण्याची किंवा कोणामुळे आपल्यावर विपरित परिणामाला सामोरे जाण्याची वेळ न येऊ देण्यासाठी 'मी कोण' हे खऱ्या अर्थाने समजले पाहिजे. माणसाला मी ची खरी ओळख संतांची ग्रंथसंपदा करून देते. त्यामुळे किमान आपले कौटुंबिक जीवन तरी आनंदी राहावे यासाठी का होईना संत साहित्य अनुभवायला हवे असेही फड म्हणाले.

# राज्यभर प्रथमच ३१ऑगस्ट हा 'भटके विमुक्त दिवस' म्हणून विविध उपक्रमांनी साजरा



वैजापूर, दि. १ (प्रतिनिधी) – शासनाच्या आदेशानुसार ३१ ऑगस्ट हा दिन सुटी असतानाही राज्यभर 'भटके विमुक्त दिवस'म्हणून विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. वैजापूर येथेही उपजिल्हाधिकारी कार्यालयात रविवार (३१ऑगस्ट) रोजी उपविभागीय दंडाधिकारी तथा उपजिल्हाधिकारी डॉ अरुण जऱ्हाड यांच्या उपस्थितीत भटक्या विमुक्त जातीतील विद्यार्थ्यांना जातीचे प्रमाण पत्र वाटप करण्यात आले. या प्रसंगी माजी शिक्षणाधिकारी, समाजसेवक धोंडीरामसिंह राजपूत यांनी या दिनाची माहिती विशद केली ते म्हणाले की, ब्रिटिश काळात १८७१ साली ब्रिटिश सरकारने कायदा काढून या समाजाच्या लोकांना गुन्हेगार समजले, त्यांच्यावर अत्याचार केले. मात्र देश स्वतंत्र झाल्यानंतर भारत सरकारने ३१ऑगस्ट,१९५२रोजी ब्रिटिश कायदा रद्द केला. व नवीन कायदा काढला ज्यात या जातीच्या लोकांना न्याय दिला. भटक्या -विमुक्त जातीच्या लोकांचा राज्य सरकार व देशाच्या प्रगतीत मोठा वाटा आहे म्हणून दरवर्षी ३१ ऑगस्ट हा दिन'भटके विमुक्त दिवस'म्हणून साजरा करावा असे शासनाने आदेशीत केले. त्याचाच भाग म्हणून उपजिल्हाधिकारी कार्यालयात हा दिन डॉ. अरुण जऱ्हाड यांच्या उपस्थितीत साजराकरण्यात येत आहे असे राजपूत म्हणाले. या समाजाच्या मुलां-मुलींना जातीचे प्रमाणपत्र डॉ.जऱ्हाड यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. शिक्षकवर्ग ही उपस्थित होता. त्यांनी या समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करावे, त्यांच्या जातीच्या नोंदी व्यवस्थित घ्याव्यात, आरोग्य तपासणी करून घ्यावी असेही राजपूत यांनी शिक्षकाना आवाहन केले.नायब तहसीलदार सूरज कुमावत,जात प्रमाण पत्र विभाग लिपिक सुनील बछे, श्री पुंड तसेच सेतूचे गोरख मापारी (ज्यांनी ही सर्व जातीची प्रमाणपत्र विनामूल्य तयार करून दिली) शिक्षक सुभाष गोमलाडू, श्री शेलार, श्री, रहाटवळ व पालक ही उपस्थित होते.

# नर्सिंग भरतीप्रकरणातील आंदोलकांना दिलासा : युवासेनेच्या मागणीला यश



छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) – नर्सिंग भरतीतील ८०:२० (पुरुष-महिला) लिंगविभाजक नियमाविरोधात सुरु असलेल्या आंदोलनाला अखेर तात्पुरता दिलासा मिळाला आहे. गेल्या अकरा दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरु असलेल्या पुरुष परिचारकांच्या आमरण उपोषणाला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक आश्वासन दिल्यानंतर स्थगिती देण्यात आली.

आंदोलनकर्त्यांच्या समर्थनासाठी युवासेनेचे कॉलेजकक्ष प्रमुख निखिल काकडे,बच्चू भांगे समन्वयक, कृष्णा सोनवणे विभाग प्रमुख, अभी पाटील, यशराज फुलारे, नासिर पठाण, अमर मुलतानी, प्रतीक ढकले, धनराज आगळे, आयान पठाण यांनी उपोषण स्थळी भेट देऊन 'तुमच्या सोबत आहोत' असे स्पष्ट आश्वासन दिले होते. त्याचबरोबर युवासेनेने माजी मंत्री अब्दुल सत्तार यांना निवेदन देऊन ही समस्या तातडीने सोडवण्याची मागणी केली होती.

युवासेनेच्या या प्रयत्नांनंतरच पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या पुढाकाराने उपोषणकर्त्यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी छत्रपती संभाजीनगर विमानतळावर २३ ऑगस्ट रोजी भेट घडवून आणली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी '८०:२० संदर्भात तातडीने कार्यवाही करतो' असे आश्वासन दिले. या आश्वासनानंतर २८ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता उपोषण मागे घेण्यात आले. सहायक महसूल अधिकारी बाबुलाल ढाकणे यांच्या हस्ते उपोषणकर्त्यांना ज्यूस पाजून उपोषण संपवण्यात आले. तथापि, उपोषणकर्त्यांनी शासनाला इशारा दिला आहे की, 'जर ८०:२० नियम तात्काळ रद्द झाला नाही, तर आम्ही पुन्हा आंदोलन छेडू.' युवासेनेच्या सातत्यपूर्ण मागणीमुळे व पाठपुराव्यामुळे शासनाचे लक्ष या प्रश्नाकडे वेधले गेले असून, अखेर पुरुष परिचारकांच्या मागण्यांना सकारात्मक दिशा मिळाल्याचे चित्र आहे.

# मधुमेहाबाबत ज्येष्ठांना मार्गदर्शन




पुणे दि. १ ( प्रतिनिधी ) – वाढत्या वयात शरीरातील साखरेचे प्रमाण वाढले तर विविध रोगांना आमंत्रण दिले जाते. त्यावर उपाय म्हणून नियमित व्यायाम, योग्य आहार तसेच वेळोवेळी वैद्यकीय तपासणीच्या अनुषंगाने औषधोपचार करणे आवश्यक आहे. असे आवाहन वेन्सर हॉस्पिटलचे डॉ. कर्णवीर टोटवाल यांनी केले. येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने आयोजित ' ज्येष्ठ नागरिक संबंधीत डायबेटिस समस्या आणि शंका निरसन' या विषयावरील मार्गदर्शनपर व्याख्यानात ते बोलत होते. कुणाल आयकॉन रोडवरील बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर शनिवारी सायंकाळी हा कार्यक्रम झाला. मधुमेह या रोगासंदर्भात ज्येष्ठ नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नांना डॉ. टोटवाल यांनी यावेळी समाधानकारक उत्तरे दिले. यावेळी व्यासपीठावर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाषचंद्र पवार, सचिव सखाराम ढाकणे, सुभाष पाटील, अनिल कुलकर्णी, शकुंतला शिंदे, भामिनी महाले यांची उपस्थिती होती. गुरुवंदनाने प्रारंभ झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सुत्रसंचलन भामिनी महाले, निर्मला कासार आणि शोभा राजगुरे यांनी केले. दिलीप चौगुले यांनी आभार मानले. अनिल कुलकर्णी, मनवेलीकर, दिगंबर राजगुरे, रेखा येळंमकर, सुरेखा पाटील आदींनी यावेळी कविता, भाव - भक्तीपर गाणी सादर केली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या सतिश पिंगळे, अनिलकुमार शाह, रमेश वाणी, विवेकानंद लिगाडे,जयपाल सिदनाळे, अशोक येळंमकर, अशोक कलाल या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## लालबागच्या राजाचे व्हीआयपी दर्शन वादाच्या भोवऱ्यात! जनसामान्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप

मुंबई, दि. १ (प्रतिनिधी)– संपूर्ण राज्यात गणेशोत्सवाची धामधूम सुरू असून, राज्यभरातून अनेक लोक या दिवसात मुंबईत लालबागच्या राजाच्या दर्शनाला येतात. गेल्या काही वर्षापासून लालबागचा राजा सार्वजनिक मंडळाला भेट देणाऱ्या भाविकांची संख्या वाढत असून, या गर्दीचे व्यवस्थापन करण्याचे मोठे आव्हान सार्वजनिक मंडळ ट्रस्ट तसेच प्रशासनाला आहे. इतकेच नव्हे तर लालबागचा राजा गणेशोत्सव मंडळात होणाऱ्या व्हीआयपी आणि नॉन व्हीआयपी दर्शनात केला जाणारा भेदभाव देखील आता वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. त्यामुळे या व्यवस्थेविरोधात महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाकडे औपचारिक तक्रार दाखल करण्यात आली आहे.

मुंबईतील ॲड.आशीष राय आणि पंकज मिश्रा यांनी ही तक्रार आयोगासमोर दाखल केली. त्यांचा आरोप आहे की, सार्वजनिक उत्सव असूनही दर्शनासाठी व्हीआयपी आणि नॉन व्हीआयपी अशी वेगळी रांग लावून सर्वसाधारण भक्तांच्या भावनांचा अनादर होत आहे. तसेच सर्वसामान्यांना तासन तास रांगेत उभे राहावे लागते, तर काही मोजक्यांना विशेष सवलत मिळते, हे मूलभूत हक्कांचे उल्लंघन आहे, अशी आयोगाकडे त्यांनी तक्रार करताना म्हटले आहे.

दर्शन सर्वांसाठी समान आणि सुलभ करण्याची मागणी संबंधीत तक्रारदारांनी आयोगाकडे मागणी केली आहे की, गणेशोत्सव हा लोकउत्सव असल्याने दर्शन सर्वांसाठी समान आणि सुलभ असावे. दर्शन व्यवस्थेत भेदभाव टाळावा आणि सामान्य भाविकांना न्याय द्यावा. मानवाधिकार आयोगाने या तक्रारीची दखल घेऊन पुढील सुनावणीसाठी संबंधितांना नोटीस पाठविण्याची शक्यता आहे. ही कारवाई झाल्यास, राज्यातील इतर गणेश मंडळांच्या दर्शन व्यवस्थांवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सोशल मीडियावर या व्हीआयपी आणि नॉन व्हीआयपी दर्शन रांगेचे अनेक व्हिडिओ व्हायरल झाले आहेत.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# 'गोकुळ'ने दूध खरेदी किंमत आणि छोट्या डेअरींसाठीच्या अनुदानात केली वाढ

कोल्हापूर, दि. १ (प्रतिनिधी) – गोकुळ डेअरी किंवा गोकुळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लिमिटेडने १ सप्टेंबरपासून गायीच्या आणि म्हशीच्या दुधाच्या खरेदी किंमतीत प्रति लिटर १ रुपयांची वाढ जाहीर केली आहे. त्याचबरोबर, संचालकांनी लहान दुग्धशाळांच्या कर्मचाऱ्यांसाठी इमारत अनुदानासोबत प्रोत्साहन अनुदान वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय घेतला तरी 'गोकुळ'ने दूध विक्री किंमतीत तात्काळ वाढ करणे टाळले आहे.

खरेदी किंमतीत वाढ झाल्यामुळे जिल्ह्यातील दूध उत्पादकांना दरमहा ४ ते ५ कोटी रुपये अतिरिक्त मिळतील. इमारतीच्या बांधकामासाठी लागणाऱ्या साहित्याच्या वाढत्या किमती आणि कामगारांच्या पगारामुळे लहान डेअरींना आर्थिक अडचणी येत आहेत. यावर उपाय म्हणून, 'गोकुळ'ने दूध संकलनावर अवलंबून असलेल्या लहान डेअरींसाठीच्या अनुदानात आठ ते दहा हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. खुल्या गोठ्यासाठीच्या अनुदान योजनेत पूर्वी किमान पाच जनावरांची आवश्यकता होती. ही अट शिथिल केली जाईल आणि आता चार जनावरे असलेल्या गोठ्यांनाही अनुदान दिले जाईल. गोकुळ डेअरीचे अध्यक्ष नवीद मुश्रीफ म्हणाले, 'दूध उत्पादकांसोबत काम करताना, आम्ही दूध दरांच्या माध्यमातून त्यांच्या कामाला न्याय देण्याचा प्रयत्न करत आहोत. लहान डेअरींचे कर्मचारी देखील एक महत्त्वाचा घटक असल्याने, त्यांना सक्षम बनवण्याची भूमिका आम्ही घेतली आहे. सध्या, जिल्ह्यातील आणि जिल्ह्याबाहेरील ७,५०० लहान डेअरींमधून दररोज १६ लाख लिटर दूध संकलन केले जाते. लवकरच, २० लाख लिटरचा टप्पा ओलांडला जाईल.'

# राष्ट्रीय सेवा योजनेत काम केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार

## गो. से. महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या उद्बोधन कार्यक्रमात डॉ. आखरे यांचे प्रतिपादन

खामगाव दि.१ (प्रतिनिधी)- युवक हा राष्ट्राचा मूळ आधार आहे. त्यामुळे तो सुसंस्कारित आणि चरित्रवान व्हावा, यासाठी राष्ट्रीय सेवा योजना पथक कार्य करीत असते. युवक हा सामर्थ्यवान असतो,त्याच्यातील सुप्त शक्तीला दिशा देण्याचे काम या पथकाच्या माध्यमातून होत असते.हिऱ्याचा पैलू पाडल्यानंतर जशी हिऱ्याला किंमत येते. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेत काम केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार येतो, असे प्रतिपादन प्रा. डॉ. हरिदास आखरे यांनी केले.

विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ,खामगावद्वारा संचालित गो.से. महाविद्यालयात नवीन प्रवेशित झालेल्या एनएसएसच्या विद्यार्थ्यांसाठी उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. डी.एस. तळवणकर,मुख् य उपस्थिती म्हणून राष्ट्रीय सेवा योजना पथक जिल्ह्याचे समन्वयक डॉ. हनुमंत भोसले,प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. हरिदास आखरे यांची उपस्थिती होती. उद्बोधन वर्ग आयोजित करण्यामागचा हेतू राष्ट्रीय सेवा योजनेचे पथक होय. कार्यक्रम अधिकारीडॉ. डी. टी. अढाऊ यांनी आपल्या प्रास्ताविकेतून या उपक्रमाचा उद्देश स्पष्ट केल ा. राष्ट्र निर्मितीच्या कार्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी नेहमीच तत्पर असतात. परंतु त्यांना दिशादर्शक मार्गदर्शनाची गरज असते असे सांगितले.

या वेळी डॉ. हरिदास आखरे यांनी सांगितले की,राष्ट्रसेवेची कल्पना मनात रुजते. या देशासाठी ज्यांनी बलिदान दिलं,हे राष्ट्र एकसंघ व्हावं आणि माझ्या देशातील सर्व लोक आनंदी राहावे, यासाठी पुढाकार घेणाऱ्या महान व्यक्तींचा आदर्श घेऊन युवकांनी वाटचाल केली पाहिजे.

ऽ । । ५ । । ल ट । । व्यक्तिमत्त्वासोबतच समाजाचे व्यक्तिमत्व घडवण्याचे काम हा युवक करत असतो. कारण राष्ट्र हे तरुणांच्या योगदानातूनच पुढे जाऊ शकते. हा विचार या भूमीमध्ये ज्यांनी रुजवला अशा पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या कार्याची महती जनमाणसात रुजवण्याच्या हेतूने युवकांनी काम केले पाहिजेत, असेही या प्रसंगी त्यांनी सूचित केल े. आजचा युवक,लोक म्हणतात की व्यसनाधीन झाला आहे,परंतु आम्ही युवकांपुढे महापुरुषांच्या आदर्श सांगण्यात कमी पडल ो म्हणून तो भटकला. आजचा तरुण दिशाहीन झाला आहे,ही खंत ही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो स्वयंसेविका प्रेरणा देशमुख हिने तर आभार



राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. नीता बोचे यांनी मानले. या कार्यक्रमाला प्रा. उमेश खंदारे,प्रा. डॉ. रोहिणी धरमकार, प्रा.मोरे,प्रा. भुतेकर, प्रा. टकले,प्रा. डॉ. तायडे व राष्ट्रीय सेवा योजना पथकातील विद्यार्थी मोठ्या संख्येने या वेळी उपस्थित होते.

समाजाची सेवा करतोना जीवनात ऊभे राहता यावे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.एस. तळवणकर यांनी विद्यार्थ्यांना यथोचित मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की राष्ट्रीय सेवा योजनेत प्रवेश घेणारा विद्यार्थी हा सर्वगुण संपन्न व्हावा. समाजाची सेवा करता करता त्याला जीवनात उभे राहता यावे. आपल्या महाविद्यालयात आयएएस किंवा आयपीएस झालेल्या व्यक्तींचे मार्गदर्शन सुद्धा पथकातील विद्यार्थ्यांना मोफत मिळणार आहे,असे त्यांनी आश्वासित केले. विद्यार्थ्यांच्या विविध सूप्त गुणांना वाव देणारे राष्ट्रीय सेवा योजना पथक हे एक व्यासपीठ आहे. त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे त्यांनी अध्यक्षीय भाषणात स्पष्ट केले. रासेयो पथक जिल्ह्याचे समन्वयक डॉ. हनुमंत भोसले यांनी राष्ट्रीय सेवा योजना पथकामध्ये कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

## विद्युत सहायकपदाच्या उमेदवारांना मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी शेवटची संधी

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- महावितरणमध्ये विद्युत सहायकपदी निवड झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी २० ते २२ ऑगस्टला पूर्ण झाली आहे. तथापि राज्यातील अतिवृष्टी व पूरपरिस्थिती तसेच इतर कारणांमुळे गैरहजर असलेल्या काही उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसाठी ९ व १० सप्टेंबरला शेवटची संधी देण्यात आली आहे.

महावितरणने जाहिरात क्र. ०६/२०२३ अन्वये विद्युत सहायक पदासाठी निवड झालेले उमेदवार व त्यांना वर्ग केल ेल्या परिमंडलांची यादी कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केली आहे. या उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची व प्रमाणपत्रांची पडताळणी संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये २० ते २२ ऑगस्टदरम्यान करण्यात आली आहे. मात्र या तीनही दिवसांत राज्यात अतिवृष्टी व पूरपरिस्थिती तसेच काही अपरिहार्य कारणांमुळे निवड झालेल्या ज्या उमेदवारांना उपस्थित राहता आले नाही, अशा काही गैरहजर उमेदवारांना मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी आणखी एक संधी देण्यात आली आहे. त्यानुसार आता ९ व १० सप्टेंबरला गैरहजर उमेदवारांच्या ऑनलाइन अर्जामधील नोंदी, अर्हता, कागदपत्रे, प्रमाणपत्रांची छाननी व पडताळणी त्यांना वर्ग केलेल्या संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये होणार आहे. सकाळी १० वाजता ही कार्यवाही सुरू होईल. त्यासाठी संबंधित उमेदवारांनी स्वतः सर्व मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांसह हजर राहणे आवश्यक आहे. जे उमेदवार आणखी एक संधी देऊनही कागदपत्रांच्या पडताळणीसाठी हजर राहणार नाही त्यांची निवड रद्द समजली जाईल आणि भविष्यात त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, असे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे. मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या छाननी व पडताळणीमध्ये विद्युत सहायकपदी निवड झालेल्या जे उमेदवार पात्र होतील त्यांच्या नियुक्तीबाबत संबंधित परिमंडलांमध्ये पुढील कार्यवाही करण्यात येईल. याबाबतची माहिती महावितरणच्या **www.mahadiscom.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## शेतात काम करताना महिलेचा सर्पदंशाने मृत्यू; बोरमाळ तांड्यातील घटना

वरठाण दि.१ (प्रतिनिधी)- शेतात निंदणीचे काम करतांना अचानक पिकांमध्ये असलेल्या नाग प्रजातीच्या सापाने दंश केल्याने महिला शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याची घटना तिडका शिवारात रविवारी सायंकाळी सहा वाजता घडली. रात्री आठ वाजता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून मृत झाल्याची घोषित केले. रुखमाबाई शिवा जाधव (वय ६०,रा. बोरमाळ तांडा) असे मृत महिलेचे नाव आहे.



सदर महिला शेतात पिकांच्या निंदणीचे काम करत असताना अचानक दगडाखाली असलेल्या नाग प्रजातीच्या सापाने तिला पायावर दंश केला असता ती बेशुद्ध पडली. तिला तातडीने बनोटी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी तिला पाचोरा येथे हलविण्यात आले. परंतु तिला वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून मृत घोषित केले. तिच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे. सोमवारी सकाळी शवविच्छेदनानंतर तिच्यावर सकाळी अकरा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

## पोलिस ठाण्यातच घेतली पाच हजार रुपयांची लाच; हवालदार रंगेहात पकडला

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- तक्रारदारांविरोधात दाखल गुन्ह्याचा बी समरी अहवाल पाठविण्यासाठी पाच हजार रुपये लाच घेताना एका पोलिस हवालदाराला ल ाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले. ही कारवाई रविवारी दुपारी एमआयडीसी सिडको पोलि स ठाण्यात करण्यात आली. हैदर अब्दुल खल ील शेख (५४, बक्कल नंबर १०९४) असे अटकेतील लाचखोर हवाल दाराचे नाव आहे. या कारवाईविषयी प्राप्त माहिती अशी की, तक्रारदार यांच्याविरोधात २२ फेब्रुवारी रोजी एमआयडीसी सिडको पोलि स ठाण्यात कलम १२३ व३(५) भा.न्या.संहिता अन्वये गुन्हा नोंद झाला होता. या गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक मुंढे करीत होते.

उपनिरीक्षक मुंढे यांना भेटण्यासाठी तक्रारदार हे १४ ऑगस्ट रोजी एमआयडीसी सिडको पोलि स ठाणे येथे गेले होते. तेव्हा हवालदार हैदर अब्दुल खलील शेखची भेट झाली. यानंतर हवाल दार शेख यांनी गुन्हा बी फायनल करण्यासाठी ल ाचेची मागणी केली. तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी २९ ऑगस्ट रोजी जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदविली.

३१ ऑगस्ट रोजी तक्रारदार हे सरकारी पंचासह उपनिरीक्षक मुंढे व हवालदार हैदर शेख यांच्याकडे पाठविण्यात आले असता मुंढे यांनी या गुन्ह्यासंबंधी तक्रारदार यांच्याकडे चौकशी केली मात्र लाचेची मागणी केली नाही. त्यानंतर तक्रारदार हे शेख यास भेटले असता त्याने तक्रारदार यांना गुन्ह्याची बी फायनल करण्यासाठी ल ाचेच्या २० हजारांपैकी तडजोडीअंती १० हजार रुपये यापूर्वी स्वीकारल्याचे मान्य केले. उर्वरित ५ हजार रुपयांची लाच पंचासमक्ष घेताच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या अधिकाऱ्यांनी झडप घालून हवालदार शेख हैदर यास रंगेहात पकडले. याप्रकरणी एमआयडीसी सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू होती. ही कारवाई पोलि स उपअधीक्षक बी. एस. जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ गजानन घायवट, पोलिस अंमलदार गजेंद्र भुतेकर, मनोहर भुतेकर, गजानन कांबळे, अशोक राऊत यांनी केली.

(पान १ वरुन)

### मराठा आंदोलकांनी व्यापलेले मुंबईतील...

(सीएसएमटी) मंत्रालय, हुतात्मा चौक येथील रस्ते अडवले आहेत. त्यांनी ते नुसते अडवलेले नाहीत तर तेथे जेवण करणे, नाचणे, नैसर्गिक विधी करणे, खो-खो, कबड्डी, क्रिकेटसारखे खेळ खेळले जात आहेत. हे न्यायाल याचे आदेश आणि पोलिसांना दिलेल्या हमीचे सर्रास उल्लंघन आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे.

माजी सैनिकांना केवळ आझाद मैदानावर आंदोलनाची परवानगी देण्यात आली होती, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे. याउलट, राज्य सरकारची बाजू अशी होती की, आंदोलनाला केवळ एक दिवसासाठी परवानगी देण्यात आली होती आणि इतरत्र आंदोलन करण्यास परवानगी नव्हती. आंदोलकांनी सर्व अटी व शर्तींचे पालन करण्याबाबत लेखी हमीपत्र दिल्यानंतरच त्यांना ही परवानगी देण्यात आली, अशी माहिती महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी न्यायालयाला दिली. न्यायालयाने नियमांचे पालन करून आंदोलन करण्याची परवानगी दिली होती आणि त्याच आधारावर ही परवानगी देण्यात आली होती. आझाद मैदान आंदोलनांसाठी आरक्षित आहे, परंतु त्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही ठिकाणी आंदोलन करण्यास परवानगी नाही, असेही सरकारने स्पष्ट केले.

पुढे आपली बाजू मांडताना राज्य सरकारने म्हटले, गणेशोत्सवात कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणं पोलिसांसाठी देखील कठीण आहे. तरी आम्ही समतोल पाळण्याचा प्रयत्न करतोय जेणेकरून कायदा व सुव्यवस्था बिघडणार नाही. शनिवारी आणि रविवारी आंदोलनाला परवानगी देण्यात आलेली नाही, केवळ ५ हजार आंदोलकांना परवानगी देण्यात आली होती. तसेच जरांगे यांनी नियमांचे उल्लंघन केल्याचे देखील सरकारने वारंवार सांगितले आहे. शहर एक खेळाचे मैदान झाले असल्याचेही राज्य सरकारने म्हटले आहे.

गुणरत्न सदावर्ते म्हणाले, मुंबईतील मराठा आंदोलनाबाबत मी २९ तारखेला तक्रार दिली, आझाद मैदानाच्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना फोन केला आणि त्यांना परिस्थितीची जाणीव करून दिली. लेखी तक्रार दिली आणि गुन्हा दाखल करण्यासाठी अर्ज केला. पण, पोलिसांनी कारवाई केली नाही, असे गुणरत्न सदावर्त यांनी न्यायालयात म्हटले. तसेच, आज राज्याचा मुख्यमंत्री मराठा नाही म्हणून हे सुरू असल्याची टीकाही गुणरत्न सदावर्ते यांनी केली आहे.

### ओबीसीच्या आरक्षणात दुसरे वाटेकरी नको

मी ओबीसीचा नेता म्हणूनच इथे बसलो आहे. मंत्रीमंडळात सुद्धा ओबीसीचा नेता म्हणूनच बसलो असल्याचे भुजबळ म्हणाले. आम्ही जिल्ह्यात उपोषण करु, यात्रा काढू, मुंबईत लाखोंच्या संख्येने मोर्चा काढू असा इशारा देखील भुजबळ यांनी दिला आहे. आमदारांनी मागणी केली म्हणजे कायदा होत नाही. उद्या कुणीही काहीही मागणी केली तर होत नाही असे भुजबळ म्हणाले. अधिवेशनात ठराव केला तरी होत नाही, नियमाचा रस्ता आहे, त्यानुसार जावे लागेल असे भुजबळ म्हणाले. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. त्यांनी ओबीसीला धक्का लावणार नाही असे सांगितल्याचे भुजबळ म्हणाले.

दरम्यान मराठा समाजाला ओबीसीत आरक्षण देण्यात यावे या मागणीसाठी मनोज जरांगे यांच्यासह लाखोंचा मराठा समुदाय मुबईत आंदोलन करत आहे. या पार्श्वभुमीवर आता ओबीसीचे नेते एकवटले असून छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत आज मुंबईत बैठक घेण्यात आली. या बैठकीला ओबीसी नेते आणि जेष्ठ मंत्री छगन भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ, आमदार पंकज भुजबळ, लक्ष्मण हाके, प्रकाश शेंडगे, यांच्यासह लक्ष्मण गायकवाड, स्नेहा सोनटक्के, सत्संग मुंढे,धनराज गुट्टे, दौलत शितोळे, नवनाथ वाघमारे, दशरथ पाटील, दिलीप खैरे, समाधान जेजुरकर यांसह इतर प्रमुख नेते उपस्थित आहे.

मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण द्या या मनोज जरांगे पाटील यांच्या मागणी संदर्भात राजकीय पक्षांनी खास करून महाविकास आघाडीने त्यांची भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी राष्ट्रीय ओबीसी महासंघाने केली आहे. महायुती आणि विद्यमान सरकारने सुद्धा ते ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही, आपली ही जुनी भूमिका पुन्हा अधोरेखित करावी, अशी अपेक्षाही ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ.बबनराव तायवाडे यांनी व्यक्त केली आहे. ओबीसी मतांवर राजकारण करणाऱ्या राजकीय पक्षांनी त्यांची भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ बबनराव तायवाडे यांनी बोलताना व्यक्त केली आहे.

### मोदी-पुतिन-जिनपिंग यांची भेट होताच...

दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास ते आमच्या देशात भरमसाठ विक्री करतात. आम्ही त्यांचे मोठे क्लाईंट आहोत. पण आमच्या अतिशय कमी वस्तू तिथे विकल्या जातात. त्यामुळे हा एकतर्फी व्यापार संबंध असून अनेक दशकांपासून हे चालू आहे.'

भारताने अमेरिकेवर भरमसाठ आयातशुल्क लादल्यामुळे अमेरिकन व्यापाऱ्यांना त्यांच्या वस्तू भारतात विकता येत नाहीत. त्यामुळेच आम्ही याला एकतर्फी आपत्ती असे म्हणतो, असे ट्रम्प यांनी सांगितले. तसेच ट्रम्प पुढे म्हणाले की, भारत रशियाकडून कच्चे तेल आणि लष्करी उपकरणे आयात करतो. मात्र अमेरिकेकडून तेवढ्या प्रमाणात आयात करत नाही.

### आंदोलक गाडीतून....

देखील सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाने घेतली. या प्रकरणी आता मंगळवारी पुन्हा सुनावणी होणार आहे.

सरकार या आंदोलकांना तिथून काढू शकत नाही, त्यामुळे कोर्टाने त्यांना काढण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी केली. मराठा आंदोलकांनी मुंबई अडवून ठेवली असल्याचा आरोपही सदावर्ते यांनी केला. आज राज्याचा मुख्यमंत्री मराठा नाही म्हणून हे सुरू आहे असा आरोपही सदावर्ते यांनी केला.

### अफगाणिस्तानात शक्तिशाली भूकंप;...

ईशान्येला असणार हे भूकंपाचे केंद्र उध्वस्त झाले आहे. फक्त आठ किलोमीटर खोलीपर्यंत झालेल्या भूकंपामुळे कुणाल प्रांतात मोठी हानी झाली. मोठ्या प्रमाणात मालमत्तेचं नुकसान झालं असून शेकडो घरांचं नुकसान झालं आहे.

भूकंपात झालेल्या नुकसानीच्या माहितीनुसार, एकाच गावात ३० जण मृत्युमुखी पडल्याचे आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे. विखुरलेल्या वस्त्यांमध्ये झालेल्या नुकसानाची अचूक आकडेवारी गोळा करण्यासाठी अजून वेळ ल ागणार असल्यासही अफगाणिस्तानच्या आरोग्य मंत्रालयाचे म्हणणं आहे. मृतांची आणि जखमींची संख्या ही मोठी आहे. या भागात पोहोचणे अवघड असल्याने बचाव पथकाच्या टीम अजूनही घटनास्थळी आहेत. असे आरोग्य मंत्रालयाचे प्रवक्ते शाराफत जमान यांनी त्यांच्या निवेदनात सांगितले.

### महिनाभरातच जीएसटी संकलनात मोठी वाढ

तरीही, ऑगस्टचा जीएसटी संकलन गेल्या वर्षीपेक्षा चांगला आहे.

या वर्षी एप्रिलमध्ये जीएसटी संकलन त्याच्या संपूर्ण इतिहासातील सर्वोच्च पातळीवर पोहोचले, जेव्हा सरकारने २.३७ लाख कोटी रुपये कमावले. ऑगस्टमध्ये जीएसटी व्यतिरिक्त, एकूण देशांतर्गत महसूल देखील वाढला आहे. ऑगस्ट २०२५ मध्ये सकल देशांतर्गत महसूल १.३६ लाख कोटी रुपये होता, जो गेल्या वर्षीपेक्षा ६.६ टक्के जास्त आहे. आयात करात थोडीशी घट झाली आहे, जी वर्षानुवर्षे १.२ टक्क्यांनी कमी होऊन ४९३५४ कोटी रुपये झाली आहे.

### मुंबईकडे जाण्यासाठी रेल्वे स्थानकांवर...

आतबाहेर तसेच परिसरात सीसीटीव्ही मॉनिटरिंग वाढविण्यात आले आहे. मुंबई मार्गावर धावणाऱ्या गाड्यांच्या आतमध्येही नजर रोखण्यात आली असून, स्थानकांवर गस्तही वाढवण्यात आली आहे. काही स्थानकांवर अतिरिक्त सुरक्षा रक्षकांची तैनात करण्यात आली आहे. बॉम्ब शोधक आणि नाशक पथक (बीडीडीएस) तसेच पथकातील श्वान २४ तास टेहळणी, तपासणीच्या कामात गुंतविण्यात आले आहे.

## श्री स्वामी समर्थ सांस्कृतिक मंडळ श्री गणेशाच्या आरतीला महंत दादासाहेब टूपके व पो.नि.सत्यजित ताईतवाले



वैजापूर दि.१ (प्रतिनिधी)- स्व.आ.आर. एम. यांनी स्थापन केलेल्या श्री.स्वामी समर्थ सांस्कृतिक मंडळाच्या श्री गणेशाच्या आरतीला तळेगाव मळे येथील आश्रमचे महंत दादासाहेब टूपके व पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सत्यजित ताईतवाले यांच्या उपस्थितीत सोमवार (ता,०१)रोजी आरती सम्पन्न झाली.

या प्रसंगी डॉ. विजयकुमार सोनी,राजेंद्र पारख,जेष्ठ पत्रकार घनश्याम वाणी, शिवसेना तालुका प्रमुख सचिन वाणी, देविदास वाणी, मधुकर साळुंके,बापू गावडे, ज्ञानेश्वर अनर्थे, सी.के.पवार,संकेत वाणी, उत्तमराव साळुंके, ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत, यांची उपस्थिती होती.


**महावीर शिक्षण प्रसारक मंडळ जायकवाडी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर**

**संचलित**

**ओंकार मुकबधीर निवासी विद्यालय पैठण व अपंग निवासी विद्यालय जायकवाडी**

**ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर शासन मान्य अनुदानीत**

**पाहिजेत**

| अ.क्र. | पदनाम | जागा | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १. | कला शिक्षक | ०१ | एटीडी / सीटीसी |
| २. | सफाईगार | ०१ | ४ थी पास |

अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त शासन मान्य अनुदानित शाळेवर दिनांक ३१/०७/०२५ रोजी रिक्त झालेल्या पदावर वरील जागा भरणे आहेत. मुलाखतीस स्वखर्चाने मुळ कागदपत्रासह दिनांक ०९/०९/२०२५ रोजी सकाळी १०.०० ते संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत अपंग निवासी विद्यालय जायकवाडी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथे मुलाखतीस हजर राहावे.

**स्वाक्षरीत**
**अध्यक्ष**

**स्वाक्षरीत**
**सचिव**